**CNR No.MHLA**090051172023

## निशाणी ९ खालील आदेश

वादी यांनी सदरचा दावा ठराव पत्राआधारे वादग्रस्त जमिनीचे खरेदीखत होऊण मिळणेबाबत दाखल केला आहे. सदर दाव्यात वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये सर्वे नं.५३/४ मधील प्लॉट क्र.१४ क्षेत्र पुर्व पश्चिम ४० फुट, दक्षिणोत्तर ३० फुट दाव्यात नमुद चतुःसिमाप्रमाणे तडजोड झाली आहे. वादी यांनी दाखल केलेल्या नि.क्र.९ कडील तडजोड पत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी यांनी दि.१२/१२/२०२३ रोजीच्या ठरावपत्रानुसार वादी यांना पंचांसमक्ष दावामिळकत दिलेली आहे. वादी यांनी सदरच्या दाव्यात दि.१२/१२/२०२३ रोजीचे ठराव पत्राची मुळ प्रत दाखल केली नाही. सदरच्या दाव्यात वादी यांनी सर्वे नं.५३/४ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्याच्या अवलोकनावरून वादी यांच्या नावाची नोंद ७/१२ उताऱ्यावर कोठेही दिसून येत नाही. यावरुन ही बाब स्पष्ट होते वादी यांनी बोगस ७/१२ उताऱ्या आधारे सदरचा दावा दाखल केला आहे. तसेच, वादी यांनी दाव्यात नमूद चतुःसिमेप्रमाणे कोणतेही कागदोपत्री पुरावा किंवा प्रतिवादी यांचे मालकी दर्शवणारे कोणतेही कागदपत्र सदरच्या

प्रकरणात दाखल केले नाही. मालमत्ता हस्तांतरण कायद्या अंतर्गत स्थावर मालमत्ता ज्याची किंमत १०० रुपयांपेक्षा जास्त असते त्याला नियमाप्रमाणे नोंदणीकृत दस्त करणे गरजेचे असते. परंतु, वादी यांनी ठराव पत्राची नोंदणीकृत दस्त करून घेतली नाही. म्हणून वादी यांची नि.क्र.९ कडे दाखल तडजोड नामंजूर करण्यात येते.

SD/-

**( श्रीमती जे.सी.गुप्ता )**

**दि.: १६/०२/२०२४** **दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर**